PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 6, ISSUE 1

# भारतीय इतिहासलेखनातील पौर्वात्यवादी दृष्टीकोनाचा मागोवा

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. (संलग्नित)
**महाराष्ट्र भारत**

**घोषवारा:**

आधुनिक भारतीय इतिहासाच्या संदर्भात वाणिज्यवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद, पौर्वात्यवाद या व अशा अनेक संकल्पना वारंवार उपयोगात आणल्या जातात. या संकल्पना म्हणजे भारतीय सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाशी निगडित आहेत. इतिहास म्हणजे नुसत्याच घटना नव्हेत, या घटनांचा सुसंगत व तर्काधिष्ठित अर्थ लावणे इतिहासामध्ये अभिप्रेत असते. या घटनांचा अर्थ लावत असताना शास्त्रीय पद्धती शास्त्र व विविध दृष्टिकोनांचा अवलंब करावा लागतो. एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमधील भारताचे शासक, बुद्धिवंत , प्रशासक यांची भारताविषयीची मनोभूमिका इतिहास लेखनाने तयार केली . या काळातील इतिहास लेखनामुळे वासाहतिक व साम्राज्यवादी धोरणाला तात्विक आधार मिळाला व हेच भारताच्या इतिहासलेखनाचे मूलभूत सूत्र ठरले. आधुनिक भारताच्या इतिहासाचे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत. ज्यामध्ये साम्राज्यवादी, वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी व पौर्वात्यवादी दृष्टिकोणाना महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून इतिहासलेखना संदर्भातील पौर्वात्यवादी दृष्टिकोनाबाबतची चर्चा केली गेली आहे.

**कळीचे शब्द:** वाणिज्यवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद, पौर्वात्यवाद, मार्क्सवादी, वसाहती.

प्रास्ताविक:

प्राचीन काळापासून साम्राज्यवाद अस्तित्वात असला तरी त्यामध्ये औद्योगिक क्रांतीने परिवर्तन घडवून आणले . औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनामध्ये वाढ झाली. त्याचबरोबर कच्चामाल, खनिजे व बाजारपेठ यांची गरज वाढली .देशांतर्गत बाजारपेठेतून ही गरज भागणे शक्य नव्हते; म्हणून साम्राज्यवादाला नवी दिशा व चालना मिळाली. आर्थिक गरजा भागवण्यासाठी, साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी औद्योगिकरण झालेल्या राष्ट्रांनी सुरुवात केली. या आर्थिक विचारसरणीला **आर्थिक साम्राज्यवाद** असे म्हणतात. त्यामुळे वसाहती दरिद्री बनल्या.

18-19 व्या शतकात युरोपीय राजवटी आशियात स्थिर झाल्यानंतर साम्राज्यवादी दृष्टिकोनातून इतिहासाचा अभ्यास सुरू झाला. वसाहतींमध्ये राज्यविस्तार जसा जसा वाढत गेला तसा तसा साम्राज्यवादी सत्तांना या स्थानिक लोकांचा इतिहास जाणून घेण्याची गरज भासू लागली . हा इतिहास अभ्यासताना ज्यांच्यावर साम्राज्य लादले गेले आहे अशा देशातील लोकांच्या दुर्बल प्रवृत्ती शोधल्या गेल्या. स्थानिक लोकांचा आत्मविश्वास नाहीसा करणे हा साम्राज्यवादी दृष्टिकोनाच्या अभ्यासा मागे होता . तसेच आपल्या साम्राज्यवादी वर्चस्वाला समर्थन शोधण्याचा प्रयत्नही या इतिहास लेखनामागे होता.

ब्रिटिश कालखंडात साम्राज्यकक्षा जशी वाढत गेली, त्या त्या प्रांतात प्रशासक, रेसिडेंट, गव्हर्नर, ब्रिटीश अधिकारी इत्यादी पोहचले . त्यांनी त्या प्रांतांचा, प्रदेशाचा इतिहास अभ्यासून लिहिण्याचा प्रयत्न केला. आपल्या साम्राज्य विस्ताराचे समर्थनही त्यांनी केले. या इतिहासकारांमध्ये जेम्स मिल, माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन , ग्रँट डफ, जेम्स टाड, विल्यम हंटर या प्रमुख लेखकांचा समावेश आहे.

ब्रिटिश सत्ता जशी जशी मजबूत होत गेली तसा-तसा इतिहास लेखनाचा पौर्वात्यवादी दृष्टिकोन मागे पडला व ब्रिटिश हितसंबंधांना पूरक इतिहास लेखनाची गरज राज्यकर्त्यांना वाटू लागली व त्यातून साम्राज्यवादी लेखन परंपरा निर्माण झाली. या काळातील इतिहास लेखक हे भारतात अनेक वर्षे काम केलेले मुलकी अगर लष्करी अधिकारी होते .या अधिकाऱ्यांनी ब्रिटिश शासन काळात घडलेल्या घटनांचे लेखन इतिहास रुपाने केले यांची भूमिका अभ्यासकांना सांगता येईल .

आधुनिक भारताच्या अभ्यासकांना विचार करावयास लावणारी पौर्वात्यवाद ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. १९७८ साली प्राध्यापक एडवर्ड सैद यांनी 'ओरियंट्यालिझम' या नावाचा ग्रंथ लिहिला. पूर्वीपासून भारती यांना अभिप्रेत असणारा ओरियंट्यालिझम चा अर्थ प्राध्यापक एडवर्ड सैद यांना अभिप्रेत नाही. त्यांनी हा शब्द मध्य पूर्वेकडील भागाला उद्देशून वापरलेला आहे. ब्रिटिश काळापासून भारताचा उल्लेख ओरिएंट या शब्दाने करीत असत. ज्या ब्रिटिश विद्वानांनी प्राचीन भारताचा अभ्यास केला होता, त्यामध्ये सर विल्यम जोन्स, चार्लस् विल्किन्सन, एच. टी. कोलब्रुक, मॅक्सम्यूलर, जेम्स प्रिन्सेप यांचा समावेश होतो.

**पौर्वात्यवाद / ओरियंट्यालिझम**

१८ व्या शतकाच्या अखेरीस इंग्रजी साहित्यामध्ये 'स्वच्छंदतावाद' हा विचारप्रवाह निर्माण झाला.या साहित्यिक वादाचा तत्कालीन भारताकडे पाहण्याचा इंग्रजांचा दृष्टिकोण आपल्याला सर वॉल्टर स्कॉटच्या लिखाणातून दिसून येतो. प्राध्यापक सैद ओरियंट्यालिझम कडे या दृष्टीने पाहत नाहीत. युरोप व पश्चिमेच्या परिक्षेत्रात पूर्व (ओरिएंट) या शब्दाला महत्त्व आहे. फ्रेंच , ब्रिटिश यांना विशेष आणि जर्मनी, रशिया, स्पेन, पोर्तुगाल, इटली व स्वित्झर्लंड यांना काही प्रमाणात पौर्वात्य वादाचे महत्त्व वाटते आहे.

युरोपच्या सर्वात महत्त्वाच्या श्रीमंत, जुन्या, जागतिक संस्कृतीचा स्त्रोत म्हणून ओरिएंट ला महत्त्वाचे स्थान आहे. प्रा. सैद यांच्या मते पूर्वे मुळे युरोप व पश्चिम यांची ओळख जगाला झाली आहे. पूर्व-पश्चिम या दोघांच्याही जागतिक जनमानसातील प्रतिमा, विचार, व्यक्तिमत्व परस्पर भिन्न आहेत पण यातील कोणतीही बाब काल्पनिक नाही. पूर्व ही युरोपच्या भौतिक संस्कृतीचा व संस्काराचा अविभाज्य भाग बनली आहे.

युरोप व जगाशी संपर्क साधण्याचा अभिव्यक्तीचा मार्ग म्हणून पूर्वेकडे पाहिले जाते.पूर्व-पश्चिम मधील संपर्क हा विविध संस्था, भाषा, शब्दसमूह, विद्वत्ताप्रचुर, कल्पनाशक्ती, तत्वज्ञान, नोकरशाही, वसाहतींमधील, जीवनमान, विचारसरणी या बाबतीत एकमेकांवर प्रभाव टाकणारे हे नाते आहे.

पौर्वात्य व पाश्चिमात्य या दोन संकल्पनाना मान्यता असणारी ही संकल्पना आहे. दोन्हीकडीलही सिद्धांत, महाकाव्य, कादंबऱ्या, समाजवर्णने, राजकीय स्थित्यंतरे, चालीरीती, परंपरा

यामधील साम्य भेद स्पष्ट करणारी ही संकल्पना आहे. प्रा. एडवर्ड सैद यांच्या मते,पूर्वेकडील जगाशी संपर्क साधणारी, सतत चर्चेमध्ये असणारी व टीकात्मक परीक्षण करता येईल अशी संकल्पना म्हणजे ओरियंट्यालिझम होय. प्रा. सैद यांच्या विचारसरणीनुसार पौर्वात्य वाद हा विचार व्युह आहे. याच्या आधारावर पौर्वात्य राजकारण, समाजकारण,लष्करी सेवा, विचारसरणी, शास्त्रशुद्धता याची आपणास माहिती मिळू शकेल. पूर्व-पश्चिम या दोन संस्कृतीचा संख्यात्मक व गुणात्मक फरकांच्या आधारे आपण विचार करू शकतो.

***प्राध्यापक एडवर्ड सैद यांनी पौर्वात्यवादाची तीन ग्रहीतके मानली आहेत.**

१. पौर्वात्य वाद ही एक कल्पना आहे . तीचा वस्तुस्थितीशी संबंध आहे.

२. अंतःप्रेरणा , संस्कृती ,इतिहास व सत्ता यांचे समीकरण या संकल्पनेमध्ये आहे.

३. पौर्वात्यवाद ही असत्य किंवा मिथ्येवर आधारलेली संकल्पना नाही.

थोडक्यात, पूर्व व पश्चिम या संस्कृतीचे मोजमाप करण्याचा ओरियंट्यालिझम हा मापदंड आहे. आधुनिक विचारांचा प्रभाव व प्रेरणा घेतलेल्या युरोपियनांनी व अभ्यासकांनी इजिप्त,चीन ,ग्रीस व रोम यांच्या प्राचीन संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला . त्यातून इजिप्टालाजी , सीनालॉजी यासारख्या अभ्यासशाखा निर्माण झाल्या. अशाच प्रकारचा अभ्यास पाश्चात्त्य अभ्यासकांनी भारताबाबत केला त्यातून इंडोलॉजी ही ज्ञानशाखा विकसित झाली.

Orientalism या शब्दाला प्राच्यविचारवाद किंवा पौर्वात्यवाद हा पर्यायी शब्द वापरला जातो. परंतु पौर्वात्यवाद म्हणजे पूर्वेकडील देशांच्या भाषा, संस्कृती व इतिहासाचा अभ्यास होय. प्राचीन भारतीय व पूर्वेकडील देशांची संस्कृती समृद्ध आहे.तिचे जतन केले पाहिजे असा विचार काही विचारवंतांनी मांडला. पौर्वात्यवादी दृष्टिकोनामुळे आशियाई देशातील प्राचीन इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासाला चालना मिळाली. Orient या शब्दाचा अर्थ पूर्वेकडील जग होय. यामध्ये पूर्वेकडील आशियाई राष्ट्रांचा समावेश होतो. या पौर्वात्य जगाविषयीचा विचार अथवा दृष्टिकोन असे या पौर्वात्यवादाचे स्पष्टीकरण करता येईल. पाश्चात्य विचारवंतांना पौर्वात्यवादी दृष्टिकोनामुळे पूर्वेकडील समृद्ध परंपरेची माहिती मिळाली तसेच भारतीय इतिहासकारांना आपला इतिहास लिहिण्याची प्रेरणा मिळाली .

रुडयार्ड किपलिंग यांनी लिहिलेल्या "द व्हाइट मॅन्स बर्डनः द युनायटेड स्टेट्स अँड फिलिपिन्स आयलँड्स" (1899) ही फिलिपिन्स-अमेरिकन वॉर (1899-1902) विषयी एक कविता आहे, ज्याने अमेरिकेला फिलिपिन्स लोकांवर औपनिवेशिक नियंत्रण गृहीत धरण्यास उद्युक्त केले आहे. वांशिकदृष्ट्या त्रास देणारी, गंभीर व संवेदनशील कविता ‘व्हाइट मॅन’ मध्ये रुडयार्ड किपलिंग यांनी वांशिक श्रेष्ठत्व, भेदभाव आणि वसाहतवादाचे विषय आणले आहेत.

पौर्वात्यवादी संकल्पनेत प्रामुख्याने जपान, चीन ,भारत, इंडोनेशिया या देशांच्या इतिहासाच्या अभ्यासाचा समावेश होतो . डच, पोर्तुगीज, स्पॅनिश अभ्यासकांनी आग्नेय आशियातील शिल्प, स्थापत्य, कलांच्या प्रेरणांचा शोध घेतला. यातूनच जावा-सुमात्रा येथे प्राचीन मानवाच्या पाऊलखुणा आढळल्या. याच दृष्टिकोनामुळे प्राचीन भारताबाबतचा विचार इंग्रज विचारवंतांनी केला व त्यातून Indology ही विचारधारा उदयास आली .असा अभ्यास करणाऱ्यांमध्ये विल्यम जोन्स, जेम्स प्रिन्सेप, मॅक्समुलर यांचे योगदान मोठे आहे. पौर्वात्य जगाविषयीच्या कुतूहलाने व जिज्ञासेने प्रेरीत झालेल्या विद्वानांनी प्राचीन भारताच्या इतिहासाच्या व संस्कृतीच्या संशोधनाचा नवा प्रवाह सुरू केला.

**पौर्वात्यवादी इतिहास लेखनाची उद्दिष्टे :-**

ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत विविध कारणास्तव कंपनीच्या अधिकाऱ्यांनी भारताचा इतिहास जाणून घेण्याचे व लिहून काढण्याचे कार्य केले; तेव्हा भारतीयांना आपल्या वैभवाची कल्पना येऊ लागली. यातूनच प्राच्यविद्या शाखा (Indology) आकारास आली व आपल्याविषयी इंग्रजांनी जे लिहिलेले आहे ते किती प्रमाणात खरे लिहिले आहे याचे डोळसपणे संशोधन करणे, त्याकडे वास्तवातून पाहणे अशी एक परंपरा निर्माण झाली. पौर्वात्यवादी विद्वानांनी, भारताविषयी चिकित्सक अभ्यास करून गतकाळच्या इतिहासाची पुनर्रचना करणे हे आपले उद्दिष्ट ठरवले. तसेच प्राचीन भारताच्या इतिहासाला ब्रिटिशांनी याच दृष्टिकोनातून Classical Age असे गोंडस नाव दिले .

प्राचीन भारताच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यामागे धर्मप्रसार हे ही ख्रिस्ती/ ख्रिश्चन मिशनरीचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. प्राचीन भारतीय संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रारंभिक प्रयत्न मिशनऱ्यांनीच केला. त्यासाठी संस्कृत भाषा व धर्मग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला. हिंदू धर्मग्रंथांचे इंग्रजी भाषेत अनुवादही केले. या प्रकारच्या प्रयत्नांनी भारतीय विद्येच्या अभ्यासाचा प्रवाह सुरू झाला.

ज्या देशात राज्य करावयाचे तेथील इतिहास, संस्कृती,धर्म व लोकजीवन याविषयी निर्माण झालेल्या जिज्ञासेतून प्राचीन भारताचा परिचय करून घेण्याची इच्छा निर्माण झाली .प्राचीन भारताचा शोध घेण्यासाठी इतिहास संशोधन व लेखनाचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले.

इंग्रज अधिकार्यांना राज्य चालविण्यासाठी, प्रशासनासाठी एतदेशीयांवर अवलंबून राहावे लागे .म्हणून भारतीय भाषांचे विशेषतः संस्कृत भाषेचे अध्ययन आणि भारतीय आर्थिक, राजकीय व प्रशासकीय तसेच सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास अनिवार्य आहे ही भूमिका भारतीय इतिहासाच्या अभ्यासाला पूरक ठरली.

भारतीय समाजावर राज्य करण्यासाठी येथील समाजव्यवस्था, नीतिमूल्ये, साहित्य, शासनपद्धतीचे ज्ञान असल्यास येथे नवीन कायदे करणे सोपे होईल; तसेच कंपनीला स्थानिक लोकांचा विरोध होणार नाही तसेच प्रतिष्ठित वर्गाचा विश्वास संपादन होईल व संपर्क कायम राहील. हा दृष्टिकोन समोर ठेवून इंग्रजी शासकांना त्यांचे शासन सुरळीत चालवण्यासाठी भारताचा इतिहास संस्कृती यांचा अभ्यास केला .

पाश्चात्त्य विचारवंत, अधिकारी, विद्वान यांचा भारतीयांशी संपर्क आल्यानंतर त्यांनी प्राचीन भारतीय संस्कृती व इतिहासाची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. या संस्कृतीचे महत्त्व त्यांनी ओळखले व ते प्रभावित झाले. शास्त्रीय पद्धतीने या संस्कृतीच्या इतिहास लेखनाची गरज त्यांना भासली व ते उद्दिष्ट समोर ठेवूनच हे पाश्चात्त्य अभ्यासक अभ्यासाकडे वळले. या सर्व अभ्यासकांना Orientalist म्हणून ओळखले जाते. या पौर्वात्यवादी दृष्टिकोनातून ब्रिटिश व भारतीय विद्वानांनी अभ्यास केला.

**पौर्वात्य वादी इतिहासलेखन करणारे इतिहासकार :-**

प्राचीन भारतीय वारशाच्या संशोधनाचे दोन प्रवाह दिसून येतात. पहिला म्हणजे ब्रिटिश राज्यकर्ते व दुसरा म्हणजे भारतीय विद्वान होय .पहिल्या प्रवाहानुसार लेखन करणाऱ्यांमध्ये विल्यम जोन्स, हेन्री कोलब्रुक , जेम्स प्रिन्सेप, कनिंगहॅम, मॅक्समुल्लर इत्यादी विद्वानांचा समावेश होतो .या मंडळींचा भारतीय इतिहास लेखनाचा मुख्य उद्देश म्हणजे भारतीयांचा भूतकाळ समजावून घेऊन भविष्यात कसे धोरण आखणे तसेच आपल्या साम्राज्यवादाचे समर्थन करणे हा होता आणि 'भारतावर

राज्य करावयाचे असेल तर भारतीयांचे कायदे समजावून घेतले पाहिजेत'. असा व्यवहारवादी विचार हेस्टिंग्ज सारख्या राज्यकर्त्यांने मांडला होता .

भारतीय भाषा,संस्कृती , इतिहास यांना चालना देऊन नवे विचार, कल्पना भारतात आणाव्यात अशी हेस्टिंग्ज ची भुमिका होती. त्यांने अशा प्रकारच्या अभ्यासासाठी Oriental School ची निर्मिती केली .लंडन मधील रॉयल सोसायटीच्या धर्तीवर भारतातही 1784 मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल ' ही संस्था कलकत्ता येथे इंग्रजांनी स्थापन केली. याकामी विल्यम जोन्स ने पुढाकार घेतला. याच संस्थेने Asiatic Researches हे संशोधनाला वाहून घेतलेले नियतकालिक सुरू केले .

**सर विल्यम जोन्स:-**

प्राचीन भारतीय इतिहासाची रचना करण्यास संस्कृत भाषेचा व परंपरेचा अभ्यास करणे अगत्याचे आहे असे विल्यम जोन्सचे प्रामाणिक मत होते. विल्यम जोन्स हे भारतातील 'प्राच्यविद्येचे जनक 'म्हणून ओळखले जातात. भारतीय संस्कृती ही संपन्नशील आहे, मात्र तिची सलग माहिती उपलब्ध नसल्याने प्राचीन साहित्याच्या अध्ययनातून ती उभी करावी लागेल असे जोन्सचे मत होते . विल्यम जोन्स यांनी संस्कृत, फारसी आणि प्राचीन युरोपीय भाषांचा अभ्यास करून त्यामधील साद्दश्य दाखवून दिले व त्या आधारे या सर्व भाषांचे प्राचीन काळी एकच उगमस्थान असावे असा सिद्धांत मांडला; यास जोन्सचा 'समान भाषा जननी सिद्धांत' म्हणतात.

**जेम्स प्रिन्सेप:-**

इजिप्त, रोमन, ग्रीक संस्कृतीचे अवशेष असलेल्या शिलालेखांचा, स्थापत्याचा अभ्यास करणारी विद्याशाखा पाश्चात्त्य देशात विकसित झाली होती; त्याच धर्तीवर ब्रिटिश काळात प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्याचे कार्य जेम्स प्रिन्सेपने केले. प्रिन्सेप यांचे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे प्राचीन ब्राहमी लिपीतील अक्षरांचा अर्थ लावण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला .त्यामुळे अशोक व बुद्ध काळासंबंधी माहिती मिळण्याचा मार्ग खुला झाला.

कोलब्रुक ने वेदांचा अभ्यास करून त्यास भारतीय इतिहासाचे सुवर्णयुग संबोधले व Essays on The Vedas असा प्रबंधही त्यांनी लिहिला. रॉबर्टसन ने भगवद् गीता व शाकुंतल यांचा इंग्रजी अनुवाद केला. विल्सन यांनी राजतरंगिणी वर आधारित Hindu History of Kashmir हा ग्रंथ लिहिला .

**इंडोलॉजीस्ट:- (प्राच्यविद्या विशारद)** :

पाश्चात्त्यांच्या पौर्वात्यवादी लेखनामुळे भारतीय अभ्यासकांना आपला इतिहास, संस्कृती, साहित्य यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. भारतीय अस्मिता जागृत होताच अनेक भारतीय संशोधक, प्राच्यविद्या अध्ययनाकडे वळले. ब्रिटिश संशोधकाच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन इतिहास लेखन करणाऱ्या भारतीय विद्वानांना **प्राच्यविद्या पंडित** किंवा **इंडोलॉजीस्ट** असे म्हणतात. शिलालेख, प्राचीन अवशेषांचा शोध घेण्यातून अठराव्या शतकात पौर्वात्यवादी दृष्टिकोनातून भारता बाबतचा विचार व अभ्यास सुरू झाला. वेदिक वाङमय, पुराणग्रंथ, तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ यावर माहिती देणारे ग्रंथ प्राचीनकाळी रचले गेले. परंतु प्राचीन भारताचा सर्वांगीण परिचय करून देणारे इतिहास ग्रंथ मात्र उपलब्ध नव्हते. यातून इंडोलॉजी विकसित होत गेली. यामुळे नाणकशास्त्र , स्थापत्यशास्त्र, शिल्पकला, मूर्तिकला या विषयांवर लेखन होऊन प्राच्यविद्या विशारदांनी वेगवेगळ्या अभ्यासशाखांची सुरुवात केली. अशा अभ्यासातूनच भारतीय इतिहास लेखनाचे शास्त्र विकसित झाले. यामध्ये हेमचंद्र रायचौधरी, नीलकंठशास्त्री, पा. वा. काणे ,श्री. काशी प्रसाद जयस्वाल व आळतेकर इत्यादी विद्वानांनी भारतीय ऐतिहासिक वैभव जगापुढे आणले .

**निष्कर्ष :**

युरोपातील वैचारिक जागरणाचा परिणाम इतिहास लेखनावरही झाला, त्यातून वास्तव, वस्तुनिष्ठ इतिहास लेखनाची गरज वाटू लागली. भारतासारख्या देशाचा भूतकाळ कसा असेल? त्यांची समाजरचना व संस्कृती कशी असेल? या भूतकाळातील अज्ञानाविषयी असलेल्या कुतूहलापोटी भारतीय इतिहासाचा अभ्यास पाश्चात्त्य अभ्यासकांनी केला व त्यामुळे इतिहासलेखनास गती मिळाली.

भारतीय इतिहासाचा अभ्यास करून शुद्ध ऐतिहासिक शोध घेण्याची युरोपियन अभ्यासकांची प्रेरणाही भारतीय इतिहास लेखनाला पूरक ठरली. काही युरोपियन अभ्यासकांनी भारताच्या गतकाळाच्या इतिहासाची पुर्नरचना करणे हे आपले उद्दिष्ट ठरविले.कारण त्यांना जो इतिहास

सांगितला तो सामान्यतः पुराणे, दंतकथा, लोकगीते, पोवाडे, स्थानमहात्म्य या माध्यमातूनच सांगितला गेला होता.या माध्यमाला कोणतीही शास्त्रीय बैठक नसल्यामुळे या अभ्यासकांनी शास्त्रीय इतिहास लेखनाचा आग्रह धरला व त्यामुळे इतिहासलेखन शास्त्राचे दालन यथाक्रम आकारास येण्यास मदत झाली. थोडक्यात, भारतीय इतिहासासंदर्भातील पौर्वात्यवादी दृष्टिकोनामुळे भारतीय सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचे अवलोकन करणे सोपे झाले असे म्हणता येईल.

## संदर्भसूची :


1. B Sheikh Ali (1978), *History- Its Theory and Method*, MacMillan.
2. Collingwood R.G. (2006), *The Idea of history*, Surject publication, Delhi.
3. E Sreedharan (2009), *A textbook of historiography*, Orient blackswan publication New Delhi.
4. पवार जयसिंगराव (२००४), *आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध*, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली मुंबई.
5. मोरवंचीकर रा. श्री. (१९९९), *इतिहासलेखनशास्त्र व इतिहासकार*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
6. राजदेरकर सुहास, (१९८८), *इतिहासलेखनशास्त्र*, विद्या प्रकाशन, नागपूर.
7. डॉ. श्रीनिवास सातभाई (२०११), *इतिहास लेखनशास्त्र*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.